49429

क्र.२१ (५,०००)- २०१९.

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

राज्य महाराष्ट्र State जिल्हा जळगांव District पोलीस ठाणे मुक्ताईनगर Police Station पहिली खबर क्र. 3029 FIR No. वर्ष 2018 Year दि. 29/08/2018 Date

(i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम-1988 चे क. 7, 13(1)(d) सह 13(2) ला.प्र. का.क. प्रमाणे

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

(a) अपराधाची घटना वार दि. 29/08/18 रोजी 17.04 वा गट शिक्षणाधिकारी यांचे दालन पं.स. Occurrence of Offence Day Date from कार्यालय मुक्ताईनगर येथे, ता.मुक्ताईनगर

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00

6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 29/08/2018 वेळ 21:37
Information received at P.S. Date

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 111/18 तारीख 29/08/18 वेळ 21:37
General Diary Reference : Entry No. Date Time

माहितीचा प्रकार Type of Information : लेखी लेखी / तोंडी Written / Oral ........

गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी /बीट /दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/ Beat/ O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाण नाव गट शिक्षणाधिकारी यांचे कक्ष पं.सं. कार्यालय मुक्ताईनगर
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ........ गाव मुक्ताईनगर Post तालुका मुक्ताईनगर जिल्हा जळगाव राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable Place Village Post Taluka Dist. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant /Informant : Permanent Address

(a) नाव गुप्त ठेवले Name (b) वडिलाचे / पतीचे नाव ........ Father's/Husbands Name

(c) जन्म तारीख व वय ........ Date of Birth & Age (d) राष्ट्रीयत्व भारतीय Nationality फोन नं. ........ Phone No.

(e) पारपत्र क्रमांक ........ Passport No दिल्याची दिनांक ........ Date of Issue दिल्याचे ठिकाण ........ Place of Issue (f) व्यवसाय नोकरी Occupation

(g) धर्म Religion हिंदू जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता : गल्ली/सर्व नं. ........ Address : Ward घर/नाव नंबर ........ House/Name No फोन/मो. नंबर ........ Phone/M. No पॅन नं. ........ Pan No. ओटर्स नं. ........ Card No.

रस्त्याचे नाव ........ Road जवळचे प्रसिध्द ठिकाण ........ Nearest identifiable place गाव ........ Village पोस्ट ........ Post पो. स्टे ........ P. Stn.

तालुका ........ Taluka जिल्हा ........ Dist राज्य ........ State सध्याचा पत्ता ........ Present Address

माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I-B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासीक अमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of Known Accused (Attach seperate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary)

शालीग्राम ... पाटील वय-58 व्यवसाय- नोकरी (शिक्षण विस्तार अधिकारी व प्रभारी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती मुक्ताईनगर जि.जळगाव), रा. ... नं-37 ... साईराम नगर, ... नगर, जळगाव शिक्षण विभाग वर्ग-3

429

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ......लागलीच......
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवशकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page
..........

10. a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total value of properties stolen/ involved.
b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) ..........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural/Accidental Death. case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
F. I. R. Information brief Contents (Attach separate sheets, if required ) : Detail Write down back blank page.

फिर्यादी निता की वरिल ता.वेळी व ठिकाणी ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगाव पथकाने दि. 31/05/18 रोजी सापळा लावला असता श्री जगनसिंग वसंत पाटील, प्रभारी गट शिक्षणाधिकारी मुक्ताईनगर यांनी तक्रारदारास योच्याकडे 3000/- रुपये लाचेची मागणी करुन स्वतः स्विकारतांना त्यांना 15.25 वाजता रंगेहात पकडण्यात आले म्हणून त्यांच्या विरुद्ध वरप्रमाणे गुन्हा.

..........

..........

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2. मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ......पो.नि. श्रीमती निता कायटे, ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगाव......
2. तपास नाकारण्यात आला. त्याचे कारण. ..........
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No.2:
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ......... Rank ......... No. ........ to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S. .......... District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer Incharge, Police Station
संपूर्ण नाव Name ..........
पदनाम Rank ......संजीव भावराव पाटील......
तपासिक अं. चा कोड क्र. ......पोहेकॉ/1176......
Posting. ......मु. नगर पो.स्टे......
Code No. of I. O. ..........

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report -Form-1-A

सरकार तर्फे फिर्यादी होवून फिर्याद लिहुन देते की, मी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव येथे जुन २०१४ पासुन पोलीस
निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि.२०.०४.२०१८ रोजी पोलीस उप अधिक्षक श्री.गोपाळ ठाकुर यांच्याशी मोबाईल फोनवर संपर्क
साधुन तक्रारदार श्री.मंगेश काशिनाथ ढेंगे यांनी मुक्ताईनगर येथील एका लोकसेवका विरुध्द लाच मागणी सबंधी तक्रार असल्याची
माहीती दिली होती. त्यानुसार पोलीस उप अधिक्षक श्री.गोपाळ ठाकुर यांनी आम्हास सापळयाचे आयोजन करण्याबाबत सुचना दिल्या
होत्या.त्यानुसार आम्ही दि.२१.०४.२०१८ रोजी उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय,जळगांव यांचे कार्यालयातील दोन शासकिय
नोकर पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर सदर दोन्ही पंचांना सांगितले की, तक्रारदार हे आपणास मुक्ताईनगर कृषी उत्पन्न
बाजार समितीचे आवारातील मोकळया मैदानात भेटणार आहेत. आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कारवाई करु असे सांगीतले.

त्यानंतर दि.२१.०४.२०१८ रोजी सकाळी १०.१५ वा. खाजगी स्कार्पिओ वाहन क्रं.एम.एच.१९ सी.एम १८५५ वरील
चालक अनिल सांगोरे, पोलीस उप अधिक्षक श्री.जी.एम.ठाकुर,आम्ही स्वतः, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी खाजगी
वाहनाने अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातुन रवाना होवुन नशिराबाद, भुसावळ, वरणगांव मार्गे मुक्ताईनगर येथील कृषी उत्पन्न बाजार
समितीचे आवारात मोकळया मैदानात तक्रारदार यांनी सांगितलेल्या ठिकाणी पोहचलो. त्याठिकाणी तक्रारदार हे त्यांचे मोटार
सायकलसह उभे होते. तेव्हा आम्ही त्यांना त्यांचे नाव,पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.मंगेश काशिनाथ ढेंगे रा.
तालखेडा,ता.मुक्ताईनगर असे सांगीतले.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सोबत आणलेल्या खाजगी वाहनात बसवुन घेतले व त्यानंतर
तक्रारदार व दोन्ही पंचांची आप–आपसात ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारदार यांना त्यांची तक्रार तोंडी कथन करण्यास
सांगितली व सदर हकिगत दोन्ही पंचांना ऐकण्यास सांगीतली. त्यानुसार दोन्ही पंचांनी सदर तक्रार ऐकली. त्यानंतर आम्ही तक्रारदार
यांची तक्रार सोबत आणलेल्या लॅपटॉपवर टंकलिखित करुन घेतली. त्यानंतर सदर तक्रारीवर तक्रारदार व आम्ही सहया केल्या. सदर
तक्रारीतील लेखी मजकुर तक्रारदार यांनी तोंडी कथन केल्याप्रमाणेच असल्याची खात्री झाल्यानंतर आमच्या सुचनेनुसार दोन्ही पंचानी
सदर तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्रं.१ यांना थोडक्यात सुचना देवुन व तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु
करुन देण्याबाबत पोकॉ नासिर देशमुख यांना सुचना दिल्याने पोकॉ नासिर देशमुख यांनी सदरचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन
दोरीने तक्रारदार यांच्या गळयात घालून शर्टाच्या आत असलेल्या बनियनच्या आत लटकवुन दिले. तक्रारदार व पंच क्रं.१ यांना श्री.
जगतसिंग पाटील,यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालय,मुक्ताईनगर येथे तक्रारदार यांच्या मोटार सायकलने रवाना केले.
त्यावेळी पंच क्रं.२ व सापळा पथक हे खाजगी वाहना जवळच थांबुन होते. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.१ हे तक्रारदार यांच्या मोटार
सायकलने मुक्ताईनगर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात उभ्या असलेल्या खाजगी वाहना जवळ परत आले. तेव्हा आमच्या
सुचनेवरुन पोकॉ नासिर देशमुख यांनी तक्रारदार यांच्याकडे दिलेले डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर
आम्ही पंच क्रं.१ यांना खाजगी वाहनाजवळुन रवाना केल्यानंतरची घडलेली हकीगत विचारली असता श्री.जगतसिंग पाटील यांनी
तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती ३,०००/–रु लाचेची मागणी केल्याची हकिगत कथन केली. तसेच डिजिटल व्हाईस रेकॉर्डमध्ये
रेकार्ड झालेले संभाषण ही ऐकले तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा खाजगी वाहनात करण्यात आला आहे

श्री.जगतसिंग पाटील,गटशिक्षणाधिकारी यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम घेवुन येण्याबाबत सांगितले असल्याने आम्ही,
तक्रारदार व पंच क्र. १ यांना लाचेची रक्कम घेवुन पाठविण्याचे ठरविले त्यानंतर तक्रारदार यांनी लाचेची रक्कम श्री.जगतसिंग पाटील
यांना देण्याकरीता आणलेले ३,०००/– रु.त्यात ५००/–रु.दराच्या ०६ नोटांना अ.पा.लावुन प्रात्यक्षिक करून तसा सविस्तर
सापळापुर्वीचा पंचनामा खाजगी वाहनात करण्यात आला आहे.

सापळापुर्वीचा पंचनामा खाजगी वाहनात दि.२१.०४.२०१८ रोजी आटोपल्यानंतर तक्रारदार यांना श्री.जगतसिंग पाटील यांनी
लाचेची रक्कम घेवुन बोलविले असल्याने आम्ही तक्रारदार यांचे कडे लाचेची रक्कम देवुन पंच क्रं.१ श्री.प्रफुल्ल माणिकराव पाटील
यांचेसह श्री.जगतसिंग पाटील यांना लाचेची रक्कम देण्यासाठी कोळंबे प्राथमिक शाळा मुक्ताईनगर येथे पाठविण्याचे ठरविले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्रं.१ यांना थोडक्यात सुचना दिल्या. आमच्या सुचनेवरुन पोकॉ नासिर देशमुख यांनी
सोबत आणलेल्या एका बॅगमधुन व्हाईस रेकॉर्डर काढले व व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये कोणतेही ध्वनी
मुद्रित संभाषण नसल्याची दोन्ही पंचांची व तक्रारदार यांची खात्री करुन देण्यात आली. त्यानंतर आमच्या सुचने वरुन पोकॉ.नासिर
देशमुख यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन कोणाला दिसणार नाही, अशाप्रकारे सदरचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन
दोरीने तक्रारदार यांच्या गळयात घालून शर्टाच्या आत असलेल्या बनियनच्या आत लटकवुन दिले.त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं.१
यांच्यासह श्री.जगतसिंग पाटील, गटशिक्षाधिकारी यांना लाचेची रक्कम देण्याकरीता कोळंबे प्राथमिक शाळा,मुक्ताईनगर येथे तक्रारदार
यांच्या मोटार सायकलने रवाना केले व खाजगी वाहनात पंच क्र.२,पोलीस उप अधिक्षक श्री.जी.एम.ठाकुर, आम्ही स्वतः व सापळा
पथकातील कर्मचारी असे रवाना झालो. तेव्हा आम्ही कोळंबे प्राथमिक शाळा,मुक्ताईनगर येथे सापळा लावण्याचा निर्णय घेतला. तेव्हा
सापळा पथकातील सदस्य कोळंबे प्राथमिक शाळेच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबले होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.०१ प्रफुल्ल पाटील हे कोळंबे प्राथमिक शाळेतुन बाहेर निघाले व पंचायत समिती
कार्यालय,मुक्ताईनगर कडे रवाना याने पोलीस उप अधिक्षक श्री.जी.एम.ठाकुर, आम्ही स्वतः, पंच क्रं.२ व सापळा पथक असे
तक्रारदार व पंच क्रं.१ यांचे पाठोपाठ खाजगी वाहनात बसुन रवाना झालो. तेव्हा तक्रारदार व पंच क्रं.०१ यांनी तक्रारदार यांची मोटर

सायकल पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात उभी करुन जवळच असलेले गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे जातांना दिसले तेव्हा आम्ही मुक्ताईनगर पंचायत समिती कार्यालय आवारातील गटशिक्षणाधिकारी कार्यालय येथे सापळा लावण्याचा निर्णय घेतला. तेव्हा सापळा पथकातील सदस्य मुक्ताईनगर पंचायत समिती कार्यालयाच्या आवारातील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबले.

त्यानंतर ठीक १५.२५ वा. तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे इशारा केल्याने सदरचा इशारा पाहुन पोलीस उप अधिक्षक श्री.जी.एम.ठाकुर, आम्ही स्वत:, पंच क्र.२ व सापळा पथक असे एका पाठोपाठ तक्रारदार, पंच क्र.१ हे उभे असलेल्या ठिकाणी गेलो. तेव्हा आमच्या सुचने नुसार पोकॉ.नासीर देशमुख यांनी तक्रारदार यांच्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले व आम्ही पंच क्र.१ यांना लाचेची रक्कम कोठे आहे अशी विचारणा केली तेव्हा श्री.जगतसिंग पाटील यांच्याकडे बोट दाखवुन हे श्री.जगतसिंग पाटील,गटशिक्षणाधिकारी आहेत व त्यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली, तेव्हा तक्रारदार यांनी उजव्या हाताने त्यांच्या शर्टच्या वरील डाव्या खिश्यातील नोटांची घडी बाहेर काढुन ती श्री.जगतसिंग पाटील यांच्या समोर धरली असता श्री.जगतसिंग पाटील यांनी त्यांच्यासमोर असलेल्या टेबलावरील त्यांच्या डायरीचे पहिले पान उघडुन उजव्या हाताच्या बोटाने इशारा करून त्यात ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी समोर असलेल्या टेबलावरील डायरीवर लाचेची रक्कम ठेवली असता श्री.जगतसिंग पाटील यांनी सदरची लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन सदर लाचेची रक्कम त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशात डाव्या हाताने ठेवुन घेतली आहे असे सांगितले.

तेव्हा आम्ही स्वत:ची ओळख दाखवुन दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पोना मनोज जोशी व पोकॉ ईश्वर धनगर यांना श्री.जगतसिंग पाटील यांचे दोन्ही हात मनगटा पासुन धरुन ठेवण्यास सांगितले. त्यानंतर हात धरलेल्या स्थितीतील श्री.जगतसिंग पाटील यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्याचे नांव श्री.जगतसिंग दगडु पाटील, वय.३८ वर्षे, व्यवसाय–नोकरी, शिक्षण विस्तार अधिकारी व प्रभारी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मुक्ताईनगर जि. जळगांव, रा.प्लॉट नंबर ३७, ओम साईराम नगर,जळगांव असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हाताचा कशालाही स्पर्श न करणेबाबत सुचना दिल्या व तक्रारदार यांना गटशिक्षणाधिकारी यांच्या कक्षाबाहेर थांबण्यास सांगितले.

त्यानंतर सदर लाचेची रक्कम ही श्री.जगतसिंग पाटील,प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली असल्याने आम्ही पंच नं.२ यांना सदर पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात हात घालुन सदर लाचेची रक्कम बाहेर काढण्यास सांगितले. आम्ही सांगितल्या प्रमाणे पंच क्रं २ श्री.अहिरे यांनी श्री.जगतसिंग पाटील यांच्या पॅन्टच्या समोरील डाव्या खिशामधील लाचेची रक्कम बाहेर काढली होती. ती लाचेची रक्कम मोजुन पाहता ३,०००/– रु. (५००/– रु दराच्या ०६ नोटा ) मिळुन आले. सदरच्या मिळुन आलेल्या लाचेच्या नोटा आम्ही पंच क्रं २ यांना त्यांच्या जवळच ठेवण्यास सांगितले.

त्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांचे कक्षात पुर्ण अंधार करुन अ.व्हा.दिव्याच्या प्रकाशझोत पंच क्रं २ यांच्या जवळ ठेवलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटा सरळ करुन नोटांवर टाकुन परिक्षण केले असता ३०००/–रू.त्यात ५००/–रु दराच्या ०६ नोटांवर मागुन पुढुन अ.पा.ची हिरवट चकाकी स्पष्ट दिसुन आली. त्यानंतर कक्षात उजेड करुन सापळा पुर्व पंचनामा पंच नं.१ यांचे कडेस देवुन त्यांना त्यात नमुद लाचेच्या नोटांचे नंबर्स वाचण्यास सांगुन ते नंबर पंच क्रं.२ यांच्या कडेस असलेल्या नोटांशी पडताळणी केली असता ते सर्व नंबर्स तंतोतंत जुळुन आले. त्यानंतर आम्ही श्री.जगतसिंग पाटील यांनी लाचेची रक्कम ठेवलेल्या पॅन्टच्या डाव्या खिशाचे मुखास तसेच त्यांचे टेबलावरील डायरीचे पहिले पानावर अ.व्हा.दिव्याचा प्रकाश झोत टाकुन तपासले असता त्यावर अ.पा. पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली.तसा सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

एकंदरीत सापळा कारवाई वरुन असे निष्पन्न झाले आहे की, श्री.जगतसिंग दगडु पाटील, वय.३८ वर्षे, व्यवसाय–नोकरी, शिक्षण विस्तार अधिकारी व प्रभारी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मुक्ताईनगर जि.जळगांव, रा.प्लॉट नंबर ३७, ओम साईराम नगर,जळगांव यांनी तक्रारदार श्री.मंगेश काशिनाथ ढेंगे यांच्या पत्नीचे प्रसुतीचे वैदयकीय बिल मंजुर करण्यासाठी व तक्रारदार यांचे शाळेच्या वार्षीक निरीक्षणात तक्रारदार यांना अनुकुल अभिप्राय देण्याच्या मोबदल्यात एकुण ३५०० रू. लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,०००/–रू. लाचेची रक्कम पंच साक्षीदारांसमक्ष तक्रारदार यांच्याकडून स्वत: स्विकारतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

अशा प्रकारे श्री.जगतसिंग दगडु पाटील यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन त्यांना कायदयाने मिळण्याचे वेतन खेरीज करुन प्रवर्तक दान म्हणुन तक्रारदार यांचेकडुन ३,५००/–रु. लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,०००/–रू. लाचेची रक्कम त्यांनी स्वत: स्विकारली म्हणुन त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२)प्रमाणे गुन्हा केला आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.